वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-शुक्रवार दि.७ नोव्हेंबर २०२५ पाने ४ किंमत ३

# धन्या, तू आता पक्का अडकला

## जरांगे पाटलांनी पत्रकार परिषदेत ऐकवली ऑडिओ क्लिप



मी खमक्या होतो, म्हणून त्यांचा बाप ठरलो

सर्वपक्षीय नेत्यांना आवाहन

धनंजय मुंडेंनी परिस्थिती मर्यादेपक्षा पुढे नेली

नार्के टेस्ट करायला मी तयार आहे, उद्याच जावून अर्ज करतो

समाज इतका कमजोर झाला असे तुम्हाला दाखवायचे आहे का?

मी खमक्या होतो, म्हणून त्यांचा बाप ठरलो

Email:- dailydivyawarta@Gmail.com
Email:-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता

अंतरवली , (दिव्य न्युज):- माझं आणि धनंजय मुंडेचं वैर नाहीये. त्याने जी घटना करायला नको होती, ती त्याने केली आहे. हा चेष्टेचा विषय नाही. त्याने परिस्थिती मर्यादेच्या पुढे नेली आहे. राजकारण आणि आरक्षण एकत्र करण्याची गरज नाही, असे म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी धनंजय मुंडे यांना आव्हान दिले. मी नार्को टेस्ट करण्यासाठी अर्ज करणार, असेही प्रत्युत्तर जरांगेंनी मुंडेंना दिले आहे. मनोज जरांगे यांनी धनंजय मुंडेंवर गंभीर आरोप केला. धनंजय मुंडेंनी मला मारण्याची अडीच कोटी रुपयांमध्ये सुपारी दिली, असे जरांगे म्हणाले. त्यांनी कांचन नावाच्या व्यक्तीचाही उल्लेख केला. तो धनंजय मुंडेंचा पीए असल्याचेही जरांगे म्हणाले. धनंजय मुंडे यांनी उत्तर दिल्यानंतर मनोज जरांगे यांनी पत्रकार परिषद घेत उत्तर दिले. मला माहिती मिळाली होती. ती मी पोलिसांना दिली. घातपाताच्या प्रकरणात आठ ते दहा जण आहेत. त्यात धनंजय मुंडे पण आहे. त्या प्रकरणाची चौकशी व्हायला नको का?, असे जरांगे म्हणाले. धनंजय मुंडे नार्को टेस्ट करायची म्हणत असतील, तर मी नार्को टेस्ट करून घ्यायला तयार आहे. उद्या मी गृह मंत्रालयात, न्यायालयात, पोलीस अधीक्षक कार्यालयात, ▶▶ पान २ वर

### मी खमक्या होतो, म्हणून त्यांचा बाप ठरलो

मराठा समाजाला शांत राहण्याचे आवाहन करताना जरांगे पाटील यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. तुम्ही शांत राहा म्हणजे मला सुखाचे दिवस आणता येईल... हा नायनाट नक्की करू. आपण बेसावध असतो तर घटना घडून गेली असती, मी सतर्क होतो म्हणून मी त्यांचा बाप ठरलो, असे अत्यंत भावनिक आणि रोखठोक विधान त्यांनी केले.

# कर्मा रिपीट्स हे जरांगेंनी लक्षात ठेवावे या सर्व गोष्टी जरांगेंना महागात पडतील

## मुख्यमंत्री, भुजबळांची आयमाय काढली; पकडलेले कार्यकर्ते त्यांचे तरी आरोप माझ्यावर?-आ.धनंजय मुंडे

### एआयच्या माध्यमातून आज काहीही तयार करता येतं; ४ दिवसांनी ते आणखी काय दाखवणार याची उत्सुकता



परळी, (दिव्य न्युज):- मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांनी माजी मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) नेते धनंजय मुंडे यांवर हत्येचा कट रचल्याचा गंभीर आरोप केला आहे. या आरोपांमुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. दरम्यान, या आरोपांना उत्तर देण्यासाठी धनंजय मुंडेंनी आज पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी जरांगेंचे आरोप फेटाळले आणि नार्कोटेस्टची मागणी केली. यावेळी मुंडे म्हणाले, जरांगे पाटील ऑन एअर म्हणतात, मला संपवून टाकतील. या विधानानंतर राज्यात कायदा आणि सुव्यवस्था आहे का? असा प्रश्न उपस्थित होतो. गेली ३० वर्ष मी सामाजिक आणि राजकीय जीवनात आहे. स्वर्गीय गोपीनाथ मुंडे आणि अण्णांनी जात पात पाहायची नाही, असे शिकवले. मी आजवर कधीही जात पाहून काम केले नाही. माझे जीवन आणि मरण हे गरीबातीली गरीब माणसाला मोठे करण्यासाठी आहे. जरांगेंचे आता अति होत आहे. या प्रकरणाची सीबीआय चौकशी करण्याची मागणी मी मुख्यमंत्र्यांकडे करणार आहे. याशिवाय, माझी आणि जरांगेंची ब्रेन ▶▶ पान २ वर

### वकिलांशी चर्चा करून पुढील पाऊल

मुंडे यांनी यापूर्वी जरांगे पाटील यांच्यावर केवळ एकाच सभेत टीका केली होती, मात्र त्यानंतर त्यांनी शांतता राखली होती. आता वकिलांशी चर्चा करून पुढील कायदेशीर पाऊल उचलणार असल्याचे मुंडे यांनी स्पष्ट केले. तसेच मुंडे यांनी जरांगे यांच्या मेव्हण्यावर वाळू तस्करीचा आरोप करत, कोणाच्या गाडीत मोबाईल टाकणे, गाडीचे लोकेशन ट्रेस करणे, हेच काम आहे का? असा सवाल केला.

### 'त्यांचा दोन समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न'

मुंडे यांनी जरांगे यांच्या भूमिकेवरही गंभीर टीका केली. एका समाजाला संपविण्याची भाषा अंतरवाली येथून सुरू झाली आणि दोन समाजात फूट तेथूनच पडली, असे मुंडे म्हणाले. धनंजय मुंडे म्हणाले, जरांगे तुम्हाला एका समाजाने डोक्यावर घेतले आहे, पण थोतांड करू नका. केवळ ओबीसी आरक्षणाची बाजू घेतो म्हणून आमच्यावर विनाकारण खोटे आरोप केले जात आहेत. आम्हाला संपूर्ण समाज एकत्र करायचा आहे, म्हणून आम्ही शांत आहोत.

कार्यकाळात उल्लेखनीय कामगिरी,वार्ड क्र.१५ मधून संवाद बैठकीला प्रतिसाद

## जनतेने दिला प्रतिसाद 'अन्वर मिस्किन यांनाच पुन्हा संधी'



परळी , (दिव्य न्युज):- परळी शहरातील वार्ड क्रमांक १५ मध्ये माजी नगरसेवक अन्वर मिस्किन यांनी आगामी नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या भावना जाणून घेण्यासाठी आयोजित केलेल्या संवाद बैठकीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ही बैठक हाजी शेख लाल मिस्किन यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

या बैठकीस वाडातील नागरिक, व्यापारी, उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते तसेच विविध समाजघटक मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीदरम्यान नागरिकांनी अन्वर मिस्किन यांच्या कार्यकाळाचा गौरव करत, त्यांच्या ▶▶ पान २ वर

जैन मंदिर ट्रस्ट भूखंड प्रकरणी

## राष्ट्रसंत आनंदऋषीजी महाराजांच्या समाधीसमोर शपथ घेऊन या १८ प्रश्नांची उत्तरे द्या

### मनोज सुवालाल गुंदेचा यांचे ट्रस्ट अध्यक्ष मुथा, लोकप्रतिनिधी, भाडेकरूला खुले आव्हान





बीड , (दिव्य न्युज):- जैन मंदिर ट्रस्ट भूखंड हडप करत त्या ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे कार्यालय थाटल्याचा आरोप ठाकरे शिवसेनेचे शहर प्रमुख किरण काळे यांनी केला होता. धर्मदाय आयुक्तांकडे तशी तक्रार त्यांनी केली होती. त्यानंतर ट्रस्ट अध्यक्ष सुभाष मुथा, भाडेकरू गणेश गोंडाळ यांनी काळे यांचे आरोप खोटे, दिशाभूल करणारे असल्याचा आरोप केला होता. त्यावर आता जैन समाजाचे मनोज सुवालाल गुंदेचा यांनी अनेक प्रश्न उपस्थित करत ट्रस्टचे अध्यक्ष मुथा, ▶▶ पान २ वर

मुलगा पार्थवर जमीन घोटाळ्याचे आरोप, अजितदादा तातडीने वर्षावर पोहोचले

## भूखंड खरेदी प्रकरणात तिघाविरुध्द गुन्हा दाखल, एफआयआर मध्ये पार्थ पवारांचे नाव नाही



मुंबई , (दिव्य न्युज):- महाराष्ट्राच्या राजकारणातून एक मोठी बातमी समोर आली आहे. एकीकडे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीकडून १,८०० कोटींचे बाजारभाव असणारी जमीन केवळ ३०० कोटींमध्ये खरेदी करण्यात आली. या खरेदी व्यवहारात शासनाची १५२ कोटींची फसवणूक करण्यात आली आहे. विशेष म्हणजे खरेदी व्यवहारात केवळ ५०० रुपये मुद्रांक शुल्क भरण्यात आले आहे. या प्रकरणावरून राजकीय वातावरण तापलं आहे, तर या प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चौकशीचे निर्देश दिले आहेत, या घडामोडीदरम्यान आज उपमुख्यमंत्री अजित पवार हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीसाठी दाखल झाले. अजित पवारांचे सुपुत्र पार्थ पवार यांच्यावर कथित जमीन घोटाळ्याप्रकरणी आरोप झाल्यानंतर या भेटीला विशेष महत्त्व प्राप्त झाले होते. या संपूर्ण प्रकरणात मुख्यमंत्र्यांनी चौकशी करावी अशी प्रतिक्रिया याआधी अजित पवारांनी दिली होती. मात्र अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीमध्ये पार्थ पवार प्रकरणाबाबत कोणतीही ▶▶ पान २ वर

## एमआयएम समविचारी पक्षांना सोबत घेवून नगर पालिका ताकदीने लढवणार

### ॲड.शफीक भाऊ; इच्छुकांनी अर्ज दाखल करावेत



बीड , (दिव्य न्युज):- स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूका पुर्ण ताकदीने लढवण्याचा निर्णय पक्षाने घेतला आहे. पक्षाध्यक्ष खा.असोदोद्दीन ओवेसी, प्रदेशाध्यक्ष इम्तीयाज जलील यांच्या नेतृत्वाखाली बीडसह जिल्हाभरातील नगर पालिका निवडणूक पुर्ण तयारीने लढवण्यात येणार आहेत. बीडमध्येही नगराध्यक्ष पदासह नगरसेवक पदाचे सर्व उमेदवार देण्यात येणार आहेत. समविचारी पक्ष आणि व्यक्तींना सोबत घेऊन बीड नगर पालिकेत परिवर्तन घडवणार असल्याचे ▶▶ पान २ वर

## प्रभाग क्रं. ६ मधून जलील लालाच तुतारीचे उमेदवार


### लाला यांच्या जोडीला कोण उमेदवार येतो याकडे सर्वांचे लक्ष



बीड, (दिव्य न्युज):- प्रभाग क्रं.६ मधून शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून कोणाला उमेदवारी मिळते याकडे सर्वांचे लक्ष लागून होते. अखेर जलील लाला यांना आ.संदीप क्षीरसागर व माजी आ.सय्यद सलिम यांनी जलील लाला यांची उमेदवारी अंतिम केली आहे.

प्रभाग क्रं. ६ मधून जलील लाला हे नगरसेवक राहिलेले आहेत. त्यांच्या कार्यकाळात अनेक दर्जेदार आणि विकासाभिमुख कामे झाली आहेत. प्रत्येकांच्या कामी येणारे म्हणुन जलील लाला यांची ओळख आहे. प्रभागात त्यांचा दांडगा जनसंपर्क असुन त्यांनी केलेल्या विकास कामांमुळेच त्यांचा विजय आता निश्चित झाला आहे.प्रभाग क्रं. ६ मधून तुतारीचा आवाज जोरदार राहणार असून जलील लाला यांना उमेदवारी मिळाल्याने आता या प्रभागात जलील लाला यांनी प्रचारालाही सुरूवात केली आहे. मागील काही दिवसापासून ते प्रभागात गाठी भेटी घेत होते. मतदार ही त्यांना भरभरून प्रतिसाद देत होते. त्यांच्या उमेदवारीमुळे प्रभागात विरोधी उमेदवारांना घाम फुटल्याशिवाय राहणार नाही. जलील लाला यांच्या कामांमुळे त्यांना ही निवडणूक अत्यंत सोपी जाणार आहे. जलील लाला यांना उमेदवारी मिळाल्याने त्यांच्या समर्थकांमध्ये जल्लोष निर्माण झाला असून त्यांची जोडीला कोण उमेदवार येतो पक्ष व आ.संदीप क्षीरसागर व माजी आ.सय्यद सलीम हे कोणाला उमेदवारी देतात याकडे प्रभागातील मतदारांचे लक्ष लागून आहे.

## पुण्यात आणखी एक जमीन घोटाळा, तहसीलदारांसह ९ जणांविरोधात गुन्हा



पुणे , (दिव्य न्युज):- पुणे शहरात आणखी एक मोठा जमीन घोटाळा समोर आला आहे. राज्याच्या कृषी विभागाच्या जमिनीबाबत अपहार केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सरकारी जमिनीवर बेकायदेशीर ताबा मिळवल्याप्रकरणी तहसीलदार सूर्यकांत येवले यांच्यासह शितल तेजवानी, दिग्विजय पाटील यांच्याविरोधात आणखी एक गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खडक पोलिस ठाण्यात हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.तहसीलदार सूर्यकांत येवले, ▶▶ पान २ वर

# बीडमध्ये 'व्हेल'च्या उलटीची तस्करी करणारा गजाआड

बीड, (दिव्य न्युज):- शहरातील चऱ्हाटा फाट्यावर एका कारमध्ये दोन जणांनी व्हेल माशाची उलटी विक्रीसाठी घेऊन जात असताना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या कारवाईत सव्वा कोटींचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला असून याचा तपास सुरु असल्याचे कळते.

सोन्यापेक्षाही महाग समजल्या जाणार्या व्हेल माशाच्या उलटीची विक्री करणारे दोघे बीड शहरात येतं असल्याची माहिती सपोनि बाळराजे दराडे यांना मिळाली होती. त्यांनी पोलीस अधीक्षकांना याची माहिती दिल्यानंतर शिवाजीनगर पोलिसांना कारवाई चे आदेश देण्यात आले. त्यानुसार शहारा बाहेरील एका हॉटेलजवळ चऱ्हाटा फाटा येथे शैलेश प्रभाकर शिंदे (वय-३८, हवेली, पुणे) व विकास भीमराव मुळे (वय-३० रा. शिखरवाडी,ता. पाटोदा) या दोन संशयितना ताब्यात घेण्यात आले आहे.दरम्यान



व्हेल माशाचा वावर खोल समुद्रात असतो. या माशाच्या कोणत्याही अवयवाचा व्यापारी वापर गुन्हा आहे. हा मासा शारीरिक प्रक्रियेतून उलटी करतो. ती उलटी द्रव स्वरूपात असते.या उलटीला अंबर ग्रीस असे म्हटले जाते.औषध तसेच अत्तर निर्मितीत एक खूप महत्त्वाचा घटक म्हणून व्हेल माशाच्या या उलटीचा वापर केला जात असल्याचे तज्ज्ञ सांगतात.पोलिसांनी या दोघांकडून सव्वा किलोच्या घरात उलटी जप्त केली आहे. ज्याची किंमत १ कोटी २१ लाख ५० हजार असल्याचे सांगितले जाते. सध्या या उलटी ची तपासणी करण्यात येतं असून पोलिसांना ही उलटी व्हेलं माशाचीच असल्याचा संशय आहे. दरम्यान बीड जिल्ह्यात पहिल्यांदाच शिवाजीनगर पोलिसांना व्हेलं सारख्या तस्करीत मोठी कारवाई करण्याची संधी मिळाली आहे. जिल्ह्यात यापूर्वी अशी कोणतीही कारवाई पोलिसांना मिळाली नव्हती अश्याही चर्चा आहेत.पोलीस निरीक्षक किशोर पवार,पोलीस उपनिरीक्षक एम. एस. सोन्ने, रवी आघाव आदींनी केली आहे.

# बीडमध्ये एकाच व्यक्तीचे ८ वेळा नाव; ३,९२९ दुबार मतदार !

## १ लाख ८० हजार मतदार; आचारसंहितेचे पालन करा

बीड, (दिव्य न्युज):- बीड येथील नगरपालिकेची अंतिम मतदार यादी प्रकाशित झाली आहे. यात एका व्यक्तीचे नाव तब्बल आठ वेळा आढळले आहे. यासोबतच दुबार नावे असणाऱ्या मतदारांची संख्या तब्बल ३ हजार ९२९ एवढी आहे. या सर्वांची पडताळणी करून दुबार नावांवर शिक्का मारला जाणार आहे. तसेच १ लाख ८० हजार मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी कविता जाधव यांनी दिली. यावेळी मुख्याधिकारी शैलेश फडसे यांचीही उपस्थिती होती.

बीड नगरपालिका निवडणुकीसाठीची तयारी पूर्ण झाली आहे. गुरुवारी याच संदर्भात बीडच्या निवडणूक विभागाने पत्रकार परिषद घेऊन माहिती दिली. बीड पालिकेसाठी १ लाख ८० हजार ६५८ एवढे मतदार आहेत. याची यादी प्रकाशित झाल्यानंतर राज्य निवडणूक आयोगाने पालिकेला पत्र दिले. यात ३ हजार ९२९ मतदारांच्या नावांसमोर २ स्टार दाखविण्यात आले होते. यात नावे समान असणे, पहिले,



मधले आणि आडनाव समान असल्याचा उल्लेख आहे. आता या सर्वांची प्रगणकाकडून खात्री केली जाणार आहे. यात सत्यता आढळल्यास, संबंधितांकडून एकाच ठिकाणी मतदान करण्याचे हमीपत्र घेतले जाणार आहे. हे सर्व लोक एकाच ठिकाणी मतदान करतील, याची काळजी घेतली जाईल. एवढेच नव्हे तर या सर्वांची यादी केंद्र प्रमुखांनाही दिली जाणार आहे. एखादे नाव विसरले तरी मतदान केंद्रावर आल्यावर त्यांच्याकडून हमीपत्र घेतले जाणार असल्याचे जाधव आणि फडसे यांनी सांगितले. २७ नोव्हेंबरपर्यंत दुबार नावांसमोर 'खोटे' असा शिक्का मारण्याची कारवाई केली जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

### मतदान केंद्रांवर सीसीटीव्ही बसवा

बीड पालिकेत गुरुवारी सकाळी राजकीय पक्षांची बैठक घेण्यात आली. यात त्यांनी काही मागण्या केल्या. यात प्रामुख्याने विधानसभा निवडणुकीप्रमाणेच प्रत्येक मतदान केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, अशी मागणी करण्यात आली.

पान १ वरून

## धन्या, तू

जिल्हाधिकारी कार्यालयात जाणार आणि नार्को टेस्ट करण्यासाठी अर्ज करणार. धन्या मी तुझ्यासारखा नाहीये. मी जातवाण आहे. मी असे खुनाचे, घातपाताचे आरोप करू शकत नाही. नार्को टेस्टला सगळ्यात आधी जाईल, तू काय सीबीआयची मागणी करतो?, अशी टीका जरांगेंनी धनंजय मुंडेंवर केली आहे.

दुसऱ्या मुंडे गटाचे लोक वापरायचे आणि ते तुझेच आहेत, असे म्हणायचे. धन्या तू आता पक्का अडकला आहे, असे जरांगे म्हणाले. ऑडिओ क्लिप ऐकवत जरांगेंनी सांगितले की, या क्लिपमधील २ आरोपी आहेत. तुम्ही पैशांसाठी मूळावर उठतात का? समाज इतका कमजोर झाला असे तुम्हाला दाखवायचे आहे का? मी समाजासाठी रक्त सांडायला तयार आहे, अशी टीका जरांगे पाटलांनी केली.

मराठा आरक्षणासाठी राज्यात मोठे आंदोलन उभे करणारे नेते मनोज जरांगे पाटील यांच्या हत्येचा २.५ कोटी रुपयांचा कट उघडकीस आल्यानंतर, आता या प्रकरणाला मोठा राजकीय वळण मिळाले आहे. जरांगे पाटील यांनी थेट माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर हा कट रचल्याचा गंभीर आरोप केला आहे. जरांगे पाटील यांनी संपूर्ण घटनाक्रम सांगताना, मराठा समाजाने शांत राहण्याचे आणि राज्यातील सर्व नेत्यांनी या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेण्याचे आवाहन केले आहे.

अंतरवाली सराटी येथे पत्रकारांशी बोलताना मनोज जरांगे पाटील यांनी हत्येच्या कटाचा सूत्रधार 'एका मोठ्या व्यक्ती'चा उल्लेख करत थेट धनंजय मुंडेयांचे नाव घेतले. जरांगे पाटील यांनी सांगितलेला घटनाक्रम धक्कादायक आहे. जरांगे पाटील याबाबत म्हणाले, हत्येसाठी तब्बल अडीच कोटी रुपयांची सुपारी ठरली होती, त्यापैकी ५० लाख रुपये देण्यात आले होते. बीडमधील कांचन नावाचा व्यक्ती धनंजय मुंडे यांचा पीए (कार्यकर्ता) आहे. त्याने दोन आरोपीपैकी एका आरोपीला त्याने परळीला नेले होते. त्यानंतर भाऊबीजेच्या दिवशी झाल्टा फाटा येथे धनंजय मुंडे यांनी या आरोपींची भेट घेतली. 'आम्ही त्याला ठोकतो' असे आरोपींनी सांगितल्यावर, मुंडे यांनी 'मी जुनी गाडी देतो' असे आश्वासन दिले. या घातपाताच्या कटाचे मूळ धनंजय मुंडे आहे.'' असा दावा जरांगे यांनी केला. तसेच खून करून राजकारणामध्ये माणूस मोठा होत नाही. हा प्रकार गंभीर आहे, सर्वांनी हुशार होणे गरजेचे आहे, असे आवाहन देखील त्यांनी यावेळी केले.

सर्वपक्षीय नेत्यांना आवाहन

जरांगे पाटील यांनी केवळ मराठा नेत्यांनाच नव्हे, तर राज्यातील सर्व ओबीसी नेते आणि मुस्लिम नेत्यांनाही या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेण्याची विनंती केली. विरोधात भाषण करणारा परवडला, पण जीव घेणारा नाही. आज माझ्यावर बेतली, उद्या तुमच्यावर बेतल, असा इशारा देत त्यांनी 'यांचा नायनाट करणे गरजेचे आहे,' असे ठणकावून सांगितले. या गंभीर आरोपांमुळे राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे, आणि आता धनंजय मुंडे या आरोपांना काय प्रत्युत्तर देतात, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांची हत्या करण्याचा कट रचून अडीच कोटींची सुपारी दिल्याची तक्रार बुधवारी रात्री पोलिस अधीक्षकांकडे देण्यात आली. स्वत: जरांगे पाटील यांनीही बुधवारी मध्यरात्री पोलिस अधीक्षक अजयकुमार बन्सल यांची भेट घेऊन चर्चा केली. तक्रारीनुसार पोलिसांनी तातडीने पावले उचलत गेवराईतून दोन संशयितांना चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. या प्रकरणानंतर जरांगे पाटील यांच्या सुरक्षेत वाढ करण्यात आली आहे.

## कर्मा रिपीट्स हे

मॅपिंग, नार्को टेस्ट करावी, असेही मुंडेंनी यावेळी म्हटले.निवडणुकीच्या तोंडावर काही तरी नावे घेतात. मी दर सोमवारी गेस्ट हाऊसला बसतो. अनेक लोक येऊन भेटतात. अटक केलेल्यांपैकी कुणी भेटले असेल, बाजूला जाऊन बोलले असेल. मी सामान्य सरळ माणूस आहे. भेटल्याने आणि बाजूला बोलल्याने मला कळत नाही यात कसला कट रचला जातो. अटक झालेले कार्यकर्ते त्यांचेच. बोलणारे कार्यकर्ते त्यांचेच, कबुली जबाब देणारे त्यांचेच. आरोप मात्र माझ्यावर करत आहेत. माझ्या जीवनात मर्डर म्हणून माझी ईमेज केली जात आहे, असा दावाही त्यांनी यावेळी केला.मुंडे पुढे म्हणाले, मी स्वतः नेहमी मराठा समाजाच्या मागण्यांना समर्थन देत आलो आहेत. मी मराठा समाजाच्या आरक्षणासाठी सातत्याने आवाज उठवला आहे. विरोधी पक्षनेता असताना मी आंदोलनांचे समर्थन केले. नगरमधील बलात्कार प्रकरणात मी स्वतः जाऊन आरोपीला पकडून दिले होते. जरांगेंना वाटते की, धनंजय मुंडे हा व्यक्ती पृथ्वीवरच नसावा. समाजात जातीय फूट पाडण्याचा प्रयत्न सुरू आह, असा आरोपही त्यांनी केला.

मी जातपातीत अडकलेलो नाही. माझे सर्व स्तरांतील मित्र आहेत. पण काही लोकांना माझा सामाजिक आणि राजकीय प्रभाव आवडत नाही. म्हणूनच मला लक्ष्य केले जात आहे. मी १७ तारखेला सभेत जरांगे यांना दोन प्रश्न विचारले, मराठा समाजाला ओबीसीत फायदा आहे की ईडब्ल्यूएस मध्ये? यावर चर्चा करूया, पण अजून उत्तर नाही. महाराष्ट्राच्या जनतेसमोर एकदा खुली चर्चा होऊ द्या. सत्य बाहेर येऊ द्या, असे जाहीर आव्हान त्यांनी यावेळी जरांगेंना दिले.

मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी आपल्या हत्येचा कट रचल्याचा थेट आरोप कॅबिनेट मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर केल्यानंतर राज्यात मोठी खळबळ उडाली होती. या अत्यंत गंभीर आरोपांवर धनंजय मुंडे यांनी आज परळी येथे पत्रकार परिषद घेऊन जोरदार प्रत्युत्तर दिले. कट प्रकरणी बोलणारे, अटक झालेले आणि कबुली देणारे सर्वजण जरांगे यांचेच कार्यकर्ते आहेत, असा दावा करत मुंडे यांनी या संपूर्ण प्रकरणाची सीबीआय चौकशी करण्याची मागणी केली आहे.

जरांगे पाटील यांनी केलेल्या 'अडीच कोटींची सुपारी', 'भाऊबीजेला भेट' आणि 'कटासाठी जुनी गाडी देण्याचे आश्वासन' या सर्व आरोपांना मुंडे यांनी 'हास्यास्पद' आणि 'निरर्थक' ठरवले. हे सर्व आरोप खोटे आहेत. या कटामागील सत्य बाहेर आलेच पाहिजे. त्यामुळे या प्रकरणाची सीबीआय चौकशी झाल्याशिवाय मी स्वस्थ बसणार नाही, असे धनंजय मुंडे यांनी ठणकावून सांगितले. तसेच या आरोपांचे सत्य बाहेर काढण्यासाठी धनंजय मुंडे यांनी स्वतःची आणि मनोज जरांगे पाटील यांची 'ब्रेन मॅप' आणि 'नार्को टेस्ट' करण्याची तयारी दर्शवली आहे.

चौकट

जुना सहकारीच संशयित

मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्या हत्येचा गंभीर कट उघडकीस आल्यामुळे राज्यात मोठी खळबळ उडाली आहे. अडीच कोटी रुपयांची सुपारी देऊन हा घातपाताचा कट रचण्यात आला असल्याची तक्रार जरांगे पाटील यांच्या सहकाऱ्यांनी बुधवारी रात्री पोलीस अधीक्षकांकडे दिली होती. या प्रकरणी गेवराई तालुक्यातील अमोल खुणे आणि विवेक उर्फ दादा गरुड या दोन संशयित आरोपींना जालना स्थानिक गुन्हे शाखेने बुधवारी मध्यरात्री चौकशीसाठी ताब्यात घेतले असून गुन्हा दाखल केला आहे. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, ताब्यात घेण्यात आलेल्यांपैकी एक आरोपी हा मनोज जरांगे पाटील यांचा जुना सहकारी असल्याचे समोर आले आहे.

धनंजय मुंडे यांच्यावर आरोप करत मनोज जरांगे म्हणाले, हत्येसाठी तब्बल अडीच कोटी रुपयांची सुपारी ठरली होती, त्यापैकी ५० लाख रुपये देण्यात आले होते. बीडमधील कांचन नावाचा व्यक्ती धनंजय मुंडे यांचा पीए (कार्यकर्ता) आहे. त्याने दोन आरोपीपैकी एका आरोपीला त्याने परळीला नेले होते. त्यानंतर भाऊबीजेच्या दिवशी झाल्टा फाटा येथे धनंजय मुंडे यांनी या आरोपींची भेट घेतली. 'आम्ही त्याला ठोकतो' असे आरोपींनी सांगितल्यावर, मुंडे यांनी 'मी जुनी गाडी देतो' असे आश्वासन दिले. या घातपाताच्या कटाचे मूळ धनंजय मुंडे आहे.'' असा दावा जरांगे यांनी केला. तसेच खून करून राजकारणामध्ये माणूस मोठा होत नाही. हा प्रकार गंभीर आहे, सर्वांनी हुशार होणे गरजेचे आहे, असे आवाहन देखील त्यांनी यावेळी केले.

## जनतेने दिला प्रतिसाद '

नेतृत्वाखाली झालेल्या विकासकामांचा उल्लेख केला.माजी नगरसेवक अन्वर मिस्किन यांनी आपल्या कार्यकाळात दिलेल्या आश्वासनांपैकी ९९ टक्के कामे पूर्ण केली असून, नागरिकांच्या छोट्या-मोठ्या अडचणींवर तत्परतेने प्रतिसाद देत त्यांनी २४ तास सेवा दिली असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले. त्यांच्या कार्यपद्धतीने समाधानी असलेल्या नागरिकांनी एकमुखाने येणाऱ्या निवडणुकीत अन्वर मिस्किन यांना पुन्हा संधी देण्याचा ठराव बैठकीत केला.

आपले मनोगत व्यक्त करताना अन्वर मिस्किन म्हणाले, मी आणि माझा परिवार जनतेची सेवा करण्यासाठी सदैव तत्पर आहे. माझे वडील आणि काका यांनी दिलेला जनसेवेचा वारसा मी जपला असून, कोणताही पक्षपात वा भेदभाव न करता सर्वसमावेशक काम करण्यावर माझा विश्वास आहे. जनतेची सेवा हेच आमचे ध्येय आहे. जर जनतेने पुन्हा एकदा संधी दिली, तर या संधीचं सोनं करून दाखवू.ते पुढे म्हणाले, आपली आजची उपस्थिती ही माझ्या कामाची खरी पावती आहे. मला पुन्हा निवडून देऊन आपला आशीर्वाद द्यावा, अशी भावनिक विनंती त्यांनी नागरिकांकडे केली.

भरगच्च उपस्थिती असलेल्या या संवाद बैठकीत भारत महाराज, मिश्रा सर, सिकंदर भाई, बाबा भाई टेलर, प्राध्यापक चव्हान सर, प्राध्यापक बोबडे सर, अँड. युसुफ सर, शहेबाज बेग, अस्लम भाई, अफसर चाचा, मोईन भाई, सुलतान भाई, मतीन भाई, मोबीन भाई यांसह धर्मगुरू, गुत्तेदार, व्यापारी, लेबर वर्ग, जेष्ठ नागरिक आणि सुशिक्षित तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते.बैठकीच्या अखेरीस उपस्थित नागरिकांनी अन्वर मिस्किन यांना पुन्हा एकदा विजयी करण्याचा निर्धार व्यक्त करत त्यांच्यावर विश्वासाचा शिक्का मोर्तब केला.

## राष्ट्रसंत आनंदऋषीजी

भाडेकरू गोंडाळ, शहर लोकप्रतिनिधींना काही प्रश्न केले आहेत. तुमच्यात नैतिकता शिल्लक असेल तर राष्ट्रसंत आनंदऋषीजी महाराज साहेबांच्या समाधीसमोर शपथ घेऊन या १८ प्रश्नांची पुराव्यांसह उत्तरे द्या, असे खुले आव्हान दिले आहे. या सर्व प्रश्नांची तुम्ही खरी आणि पुराव्यांसह उत्तर दिली तर किरण काळे हे शहर लोकप्रतिनिधी, समाजाची नाक रगडून बिनशर्त माफी मागतील. सर्व आरोप मागे घेतील, असे मनोज गुंदेचा यांनी म्हटले आहे.

गुंदेचा यांचे जाहीर सवाल : १) खोटी आणि दिशाभूल करणारी माहिती समाजाला देऊन तुम्ही कोणता अर्थपूर्ण स्वार्थ साधत आहात ? २) मंगूबाई हिरालाल व्होरा यांनी भूखंड धर्म कार्यासाठी दान केला होता. १९८७ ला ट्रस्टचे नाव उताऱ्यावर लागले आहे. आज पर्यंत ट्रस्टने या जागेत कोणते धर्म कार्य केले ? ३) तुम्ही सांगितले की इथे कधीही कोणीही साधू, संत आले नाही. मग या जागेचा तुम्ही केवळ वैयक्तिक अर्थपूर्ण हितसंबंधा साठीच आजवर वापर केला का ? तुम्ही देणगीदार मयत मातेची फसवणूक नाही केली का ? ४) मृत्युपत्रात सात भाडेकरूंची नोंद आहे. अन्य सहा भाडेकरू जागा सोडून का गेले ? ५) त्यांना कुणी पळवून लावले ? त्या भाडेकरूंना जागा कोणी खाली करायला लावली ? ६) सहा भाडेकरू गेले मात्र एक तथाकथित स्वयंघोषित भाडेकरूच कसं काय त्या ठिकाणी राहिला ? ७) मृत्युपत्रात सातवा भाडेकरू हरिभाऊ महादू गोंडाळ हा होता. त्याला केवळ एक खोली २८ रुपये भाड्याने दिली होती. तो मयत झाला आहे. त्यानंतर ती खोली ट्रस्टच्या ताब्यात का नाही घेतली ? ९) मृत्युपत्रात ही जागा कोणासही कोणत्याही कारणासाठी देऊ नये असा स्पष्ट उल्लेख देणगीदाराने केलेला असून देखील गणेश गोंडाळ नामक व्यक्तीने या भूखंडाचा ताबा कसा काय घेतला ? त्याच्या वडिलांच्या ताब्यात असणारी एक खोली अचानक संपूर्ण ५००० स्केअर फिटच्या भूखंडात कशी काय परावर्तित झाली ? मृत्युपत्रामध्ये गणेश गोंडाळ याचा भाडेकरू म्हणून कुठे उल्लेख आहे का ? १०) त्यासाठी धर्मदाय आयुक्त यांची नियमाप्रमाणे पूर्वपरवानगी घेतली आहे का ? ती तुम्ही समाजाला दाखवाल का ? ११) या जागेवर असणारी हुंडेकरी चाळ बुलडोजर लावून रात्रीतून कोणी पाडली ? १२) या जागेवर राजकीय कार्यालय थाटत केलेले बांधकाम ट्रस्टने केले आहे की अन्य कोणी ? या ठिकाणी शहर लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत राष्ट्रवादीचे कार्यालय सुरू असल्याचे टेम्पो भरून फोटो आम्ही दाखवले ते खोटे आहेत का ? १३) या बांधकामाची मनपाची परवानगी घेतली आहे का ? ती तुम्ही समाजाला दाखवाल का ? १४) राजकीय कार्यकर्ता असणाऱ्या सध्याच्या तथाकथित भाडेकरू कडून आजवर ट्रस्टच्या अध्यक्षांनी किती रक्कम बेकायदेशीर रित्या घेतली आहे ? १५) ट्रस्ट अध्यक्ष यांनी स्वतःच्या आर्थिक अडचणी दूर करण्यासाठी राजकीय नेत्या बरोबर तडजोड करून ट्रस्टची जागा संगनमत करून परस्पर विक्रीचा घाट घातला होता का ? १६) ट्रस्ट विक्रीचा निर्णय घेतल्याचे तुम्ही सांगितले. जागा विक्रीची जाहीर नोटीस ही ट्रस्टने जारी केली होती. ती प्रसिद्ध करण्यापूर्वी धर्मदाय कार्यालयाची परवानगी घेतल्याचा पुरावा तुम्ही समाजाला कधी देणार ? १७) मुळात ही जागा कधीही कुणाला विकू नये असे मृत्युपत्रात स्पष्ट म्हटलेले असताना, ते तुम्हाला ज्ञात असताना देखील तुम्ही हा घाट कोणत्या राजकीय नेत्याच्या दबावातून घातला ? विक्री नोटीस कोणी द्यायला भाग पाडले?१८) धर्म कार्यासाठीच्या ट्रस्टचे तुम्ही विश्वस्त, रखवालदार आहात की शहर लोकप्रतिनिधींचे प्रवक्ते ?

## एमआयएम समविचारी

एमआयएमचे ॲड.शेख शफीकभाऊ यांनी स्पष्ट केले आहे. त्या अनुषंगाने बीडसह जिल्ह्यातील नगर पालिका निवडणूकीत नगराध्यक्ष पदासह नगरसेवक पदासाठी इच्छुक असलेल्यांनी एमआयएम कार्यालयात आपला अर्ज सादर करावा. अर्जासोबत सामाजिक कार्याची फाईल व बायोडाटा देखील जमा करावा असे आवाहन एमआयएमच्या वतीने करण्यात आले आहे. बीडसह जिल्ह्यातील इतर नगर पालिकांसाठी त्या त्या ठिकाणच्या एमआयएम कार्यालयात इच्छुकांचे अर्ज स्विकारण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

## भूखंड खरेदी प्रकरणात

नसल्याची माहिती समोर आली आहे.

अजित पवार वर्षा बंगल्यावर मुख्यमंत्र्यासोबत महिला क्रिकेट टीम अभिनंदन करून लगेच गेले. अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांच्यामध्ये पार्थ पवार प्रकरणाबाबत कोणतीही चर्चा नाही अशी माहिती विश्वसनीय सूत्रांकडून देण्यात आलेली आहे. एकीकडे पार्थ पवारांच्या संबंधीत कंपनीवरती मोठे आरोप होत असतानाच फडणवीस आणि पवार यांच्या भेटीला महत्त्व प्राप्त झालं होतं, या भेटीमध्ये त्यांच्यात काय चर्चा होते का याकडे लक्ष लागलं होतं, मात्र यावेळी कसलीही चर्चा झाली नसल्याची माहिती समोर आली आहे.

पुण्यातील कोरेगाव पार्क जमीन व्यवहाराप्रकरणी ८ आरोपींवर गुन्हा दाखल झाल्याची माहिती आहे. फिर्यादीनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे, ही माहिती पुणे पोलीस आयुक्तांनी दिली आहे. शीतल तेजवानी, दिग्विजय पाटील, सूर्यकांत येवले,रवींद्र तारू यांच्यासह ८ जणांवर या प्रकरणी गुन्हे दाखल झाले आहेत. अमेडिया कंपनीकडून खाजगी एलएलपी आयटी कंपनी उभारली जाणार होती. यासाठी जी खरेदी विक्री केली जाणार होती, त्याच्या सहीचे अधिकार पार्थ पवारांनी दिग्विजय पाटलांना देण्याचा २२ एप्रिल २०२५ला प्रस्ताव ठेवण्यात आला. या प्रस्तावाची प्रत आता समोर आलीये. या प्रस्तावानंतर २० मे २०२५ला वादग्रस्त जमिनीचा दस्त झाला. हा दस्त दिग्विजय पाटलांच्या सहीने झाला असून पार्थ पवारांनी सहीचे दिलेल्या अधिकाराची प्रत ही सोबत जोडण्यात आलेली आहे.राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सुपुत्र पार्थ पवार (झरींह झुरी डरपव) यांच्या कंपनीशी संबंधित आणखी एक मोठा जमीन व्यवहार वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. पुण्यातील तब्बल १८०० कोटी रुपयांच्या किंमतीची जमीन केवळ ३०० कोटी रुपयांत विकण्यात आली, असा आरोप समोर आला आहे. या व्यवहारात गंभीर अनियमितता झाल्याचं उघड होत असून, केवळ ५०० रुपयांच्या स्टँप ड्युटीवर व्यवहार नोंदवला गेल्याचेही प्राथमिक तपासात दिसून आले आहे. विरोधकांनी या प्रकरणावरून सरकारवर जोरदार टीका करत रान उठवले आहे.पुण्यातील कोरेगाव पार्कमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सुपुत्र पार्थ पवारांच्या कंपनीने बाजारभावापेक्षा कितीतरी पट कमी किंमतीत ४० एकर भूखंड खरेदी केल्याचे प्रकरण समोर आले. या प्रकरणात पोलिसांनी तीन जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. ज्यांच्याविरोधात हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे, त्यामध्ये पार्थ पवारांचे नाव नाही. पोलिसांनी शीतल तेजवानी, दिग्विजय पाटील आणि रवींद्र तारू यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

पार्थ पवार यांच्या अमेडिया होल्डिंग्ज एलएलपी कंपनीने ही जमीन खरेदी केली होती. १८०० कोटी रुपयांचा हा भूखंड अवघ्या ३०० कोटी रुपयांमध्ये खरेदी करण्यात आला. त्याचबरोबर मुद्रांक शुल्कही माफ करून घेण्यात आले. हा विषय समोर आल्यानंतर राज्याचे राजकारण तापले. या प्रकरणाने राजकीय वातावरण ढवळून निघाले. या प्रकरणी सायंकाळी दस्तनोंदणी अधिकाऱ्यांकडून तक्रार देण्यात आली. या तक्रारीत पार्थ पवारांच्या नावाचा उल्लेख करण्यात आलेला नव्हता. त्यामुळे पोलिसांनीही गुन्हा दाखल करताना तिघांविरोधातच दाखल केला.

शेतकऱ्यांकडून दिग्विजय पाटील यांनी ही जमीन घेतलेली आहे. त्यात इतर दोघांना आरोपी करण्यात आले आहे, असे पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले. अमेडिया कंपनीचा पत्ता हा पार्थ पवार राहतात, तोच आहे. त्यामुळे त्यांना वाचवण्याचा प्रयत्न होत आहे का? असे पोलीस अधिकाऱ्यांना विचारण्यात आले. त्यावर अधिकारी म्हणाले की, फिर्यादीने दिलेल्या तक्रारीनुसार अधिकचा तपास करून सांगता येईल. रवींद्र तारू उपनिबंधक होते. त्यांनी याची नोंदणी केली होती. सखोल तपास केल्यानंतर यात अधिकची माहिती देता येईल, असे पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले.

## पुण्यात आणखी एक

कुलमुखत्यारधारक हेमंत गवंडे, राजेंद्र विध्वंस, ऋषिकेश विध्वंस, मंगल विध्वंस, विद्यानंद पुराणिक, जयश्री एकबोटे, शितल तेजवानी आणि दिग्विजय पाटील या सर्व ९ जणांविरोधात खडक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नायब तहसीलदार प्रवीणा चव्हाण यांनी या प्रकरणी तक्रार दाखल केली होत. १२ फेब्रुवारी २०२४ ते १ जुलै २०२५ पर्यंत हा प्रकार घडला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पुणे शहरातील मुंबई कुळ वहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चा महानगरपालिका क्षेत्रात लागू नसतानाही बोपोडी येथील चे ९ हेक्टर ही जमीन सन १८८३ पासून ॲग्रीकल्चर डिपार्टमेंट खात्याकडे म्हणजेच शासनाच्या ताब्यात व वहिवाटीत असतानाही, तसेच सदर जमीनीचे मालक व कब्जेदार सदरी ॲग्रीकल्चर डिपार्टमेंट यांचे नाव असल्याबाबत वरिष्ठांनी स्पष्ट आदेश पारित केलेले असतांनाही, सदर जमीनीचा अपहार केला या जमीनीवर व्हिजन प्रॉपर्टी तर्फे अर्जदार हेमंत गवंडे, राजेंद्र रामचंद्र विध्वंस, रुषीकेश माधव विध्वंस, मंगल माधव विध्वंस, विदयानंद अविनाश पुराणिक, जयश्री संजय एकबोटे, शितल किसनचंद तेजवाणी, दिग्विजय अमरसिंह पाटील संचालक मेसर्स अमेडिया एंटरप्रायझेस् एलएलपीचेशी हातमिळवणी व संगनमत करून सरकारी मिळकतींवर या लोकांच्या मालकी हक्क दिसून आला. बेकायदेशीर आदेश आणि पत्र तयार करून अशाप्रकारे शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी ९ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.